**प्रेसनोट दिनांक ०८/०५/२०१९**
**मार्केटयार्ड पोलीस स्टेशन, पुणे शहर**
**सॉफ्टवेअरचा वापर करुन सी.डी.आर. ॲनलिसीस कसे करावे**
**याबाबत कार्यशाळा घेतले बाबत**

---

आज रोजी सकाळी १०.०० ते ११.०० वा.चे दरम्यान मार्केटयार्ड पोलीस स्टेशन,पुणे शहर येथे मा.श्री.प्रकाश सं.गायकवाड सो, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-५,पुणे शहर व मा.श्री.मिलींद पाटील सो, सहाय्यक पोलीस उप-आयुक्त, पुणे शहर यांचे उपस्थितीत परपलरेडिएन्स टेक्नॉलॉजिस प्रा.लि.,विमाननगर,पुणे या सॉफटवेअर कंपनीकडून टेक्नीकल सपोर्ट म्हणून सी.डी.आर. प्राप्त झाले नंतर, सी.डी.आर. ॲनालिसीससाठी विकसित केलेल्या सॉफटवेअर बाबतच्या माहितीची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेस मार्केटयार्ड पोलीस स्टेशन कडील सर्व सहाय्यक पोलीस निरीक्षक व पोलीस उप-निरीक्षक यांचेसह वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संभाजी निंबाळकर हे हजर होते. परपलरेडिएन्स टेक्नॉलॉजिस प्रा.लि.,विमाननगर,पुणे चे श्री.अमनदिप सानी यांनी लॅपटॉपवर याबाबत सर्व सविस्तर माहिती देवून, उपस्थितांना मार्गदर्शन केले व पोलीस तपासात सी.डी.आर. मागवून घेतलेनंतर आरोपीस कसे ट्रॅक करता येते, टॉवर लोकेशनची माहिती कशी मिळते, मोबाईल नंबर वरुन तसेच आय.एम.ई.आय. नंबर वरुन सी.डी.आर.चे विश्लेषन कसे करावयाचे, मल्टीनंबर व सिंगल नंबर कसे ॲनालिसीस करावयाचे यासह इतर बहुमोल्य माहिती दिली.

सर्व उपस्थितांचे मार्केटयार्ड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संभाजी निंबाळकर यांनी आभार मानले आहेत.